# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३

## (सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

(१) **डॉ.देवराव होळी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वन विभाग गडचिरोली, आलापल्ली व वडसा मध्ये सामूहिक वन हक्क व पेसा अंतर्गत कंपार्टमेंट मध्ये ग्रामसभांच्या माध्यमातून बांबू कटाई करण्यात येणे, मात्र या ग्रामसभांकडे तांत्रिक मनुष्यबळ पुरेसे नसल्याने ती बांबू कटाई वनविभागाच्या माध्यमातून करण्यात येणे, यामध्ये गडचिरोली वनसंरक्षक व गडचिरोली, आलापल्ली व वडसा विभागातील उप वनसंरक्षक, सहाय्यक उप वनसंरक्षक व संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी संगनमताने आणि ग्रामसभांना विश्वासात न घेता सामूहिक वन हक्क व पेसा वनक्षेत्रा व्यतिरिक्त डीप फॉरेस्ट मधून मोठ्या प्रमाणामध्ये बांबूची कटाई करत असल्याचे निदर्शनास येणे, मागील ७५ वर्षांमध्ये जेवढी बांबू कटाई करण्यात आलेली नाही तेवढी बांबू कटाई या १ वर्षाच्या कालावधीत झाल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे मागील १ वर्षात जिल्हयातील किती ग्रामसभांना, किती प्रमाणामध्ये बांबू कटाई करण्याची परवानगी देण्यात आली, प्रत्यक्षात किती कटाई झाली त्याप्रमाणात किती बांबूची लागवड झाली व त्यामध्ये अधिक प्रमाणात कटाईसाठी जे अधिकारी दोषी आहेत त्यांचेवर कारवाई करणे, जिल्ह्यात केवळ बांबू कटाई करण्यात येत असून त्या ठिकाणी बांबूची लागवड केली जात नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान होणे, यासंदर्भात उपवनसंरक्षक, गडचिरोली यांचे कार्यालयामध्ये दोनदा बैठक घेण्यात येणे, मात्र त्यामध्ये वनविभागाच्या अधिकाऱ्यांची उदासिनता दिसून येत असल्याने कोणत्याही प्रकारचे सकारात्मक निर्णय न लागणे, अवैध बांबु कटाई अशीच सतत सुरू राहिल्यास काही कालावधीनंतर जिल्ह्यातील बांबू संपूर्णतः नष्ट होण्याची भिती निर्माण होणे, त्यामुळे सदर प्रकरणातील गैरव्यवहाराची तातडीने चौकशी करण्याची व त्यातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, शासनाने यासंदर्भात तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक २ ते ५)**

**(२) श्री.बळवंत वानखडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती शहरातील आंबेडकरी जनतेचे श्रद्धास्थान असलेले इर्विन चौक येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यालगतची खाजगी जागा पुतळा परिसर सौंदर्यीकरणाकरीता संपादीत करणेबाबत मनपा स्थायी समिती ठराव क्र.६, दिनांक १३ एप्रिल, २०१२ (कायम दिनांक २१ एप्रिल, २०१२) अन्वये ठराव मंजूर करण्यात आलेला असणे, अमरावती शिट क्र.४८ भूखंड क्र. ५ (भाग) या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा सद्यस्थितीत स्थित असणे या जागेचे उत्तरेस शिट क्र.४१ भूखंड क्र. १ (भाग) या जागेवर पुर्वी पेट्रोलपंप असणे, आज रोजी सदर जागा खुल्या स्वरुपात असून सदर जागा खाजगी मालकीची असणे, सदर जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील म्युरल (भिंती शिल्प) व परिसराचे सौदर्यीकरण करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित केलेले असणे, सदर जागा संपादित करुन देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे पत्र क्र.८३१, दिनांक ८ एप्रिल, २०१५ अन्वये जिल्हा प्रशासनाकडे सादर करणे, सदर जागेचे भूसंपादनाच्या अनुषंगाने महानगरपालिका, अमरावतीमार्फत भूसंपादन अधिकारी, अमरावती यांचेकडे आस्थापना शुल्क, मोजणी शुल्क तसेच भूसंपादनाचा एकूण खर्च रु.३,३९,९८,६६०/- रक्कम धनादेशाद्वारे जमा केलेला असणे, त्यानंतर भूसंपादन अधिनियम कलम १९ ची अधिसूचना दिनांक ३१ मे, २०१६ ला भूसंपादन अधिकारी, अमरावती यांनी प्रसिध्द केलेली असणे, अमरावती शहराची प्रारूपविकास योजना (दु.सु.) मध्ये सादर जागे मध्ये M-३३ अन्वये आरक्षण क्र. ९७(A) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर सौंदर्यीकरणाकरीता प्रस्तावित असून त्याला शासनाची मान्यता असणे, परंतु अद्यापही सदर जागेचे भूसंपादन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील सौंदर्यीकरणांसाठी उपलब्ध करून देणेबाबत शासनामार्फत विलंब होत असणे, यामुळे शहरातील तसेच जिल्ह्यातील आंबेडकरी जनता तसेच विविध संघटनांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"दिनांक १० जुलै, २०२३ रोजी तत्कालीन खनिकर्म मंत्री यांनी सुमारे रुपये २०० कोटीच्या विकास कामांना ग्रामसभेचा ठराव, अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यता, जिल्हाधिकाऱ्यांचा प्रस्ताव नसतांना महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी अधिनियम, २००१ नुसार नियमबाह्य व अवैध पध्दतीने प्रशासकीय मंजूरी देणे, उपरोक्त कायदा दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी निरसित झाला असताना व्याजाच्या रकमेतून

खनिज विकास निधीच्या व खनिज धोरणांशी विसंगत कामे मंजूर करण्यात येणे, उपरोक्त निधी वाटप करतांना खाणबाधित ग्रामपंचायतींना व परिसराला डावलून खनिकर्म होत नसलेल्या व नियमात तरतूद नसलेल्या कामांना बेकायदेशीर पध्दतीने प्रशासकीय मंजूरी देऊन खाणबाधित क्षेत्रावर अन्याय करणे, खनिज धोरणाअंतर्गत खनिज विकास निधीतून दिनांक १ ऑगस्ट, २०१२ च्या कार्यपध्दतीला डावलून वित्त विभागाने याबाबत मान्यता देऊ नये असे नमूद केल्यानंतरही मान्यता दिलेल्या या कामामुळे खाणबाधित क्षेत्रातील लोकप्रतिनिधींमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, उपरोक्त कायदा निरसित झाल्यानंतर विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता गैरमार्गाने मंजूर केलेल्या कामांना शासनाने तात्काळ स्थगिती देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"इंदापूर (जि. पुणे) येथील तसेच राज्यात पुणे, अहमदनगर, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर, सातारा व औरंगाबाद या सात जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र शेती महामंडळाच्या एकूण १४ मळ्यांवर हजारो कामगारांपैकी ८०% कामगार अनुसूचित जाती/जमाती, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय प्रवर्गातील असणे, हे कामगार कच्च्या घरांमध्ये व झोपड्यांमध्ये राहत असून या घरांची अवस्था अत्यंत दयनीय असणे, त्यांच्या राहत्या घरांची पडझड झाल्याने त्यांचे संसार उघड्यावर आले असून हे कामगार आपला जीव धोक्यात घालून त्याच पडक्या घरात राहून संसाराचा गाडा चालवत असणे, शासनाच्या माध्यमातून त्यांना इंदिरा आवास घरकुल योजनेतून घरेही मंजूर झाली असून त्यांच्याकडे घर बांधण्यासाठी स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध नसल्याने अनेकांना घरकुल मंजूर असूनही जागेअभावी शासनाच्या घरकुल योजनेपासून वंचित राहावे लागत असणे, याबाबत शेती महामंडळाच्या राज्यातील कामगारांनी निवृत्त व रोजंदार कामगार कामावर असलेले व मयत कामगारांचे वारसदार यांना राहण्यासाठी शेती महामंडळाकडे शिल्लक असलेल्या जमिनीपैकी दोन गुंठे जागा देऊन पंतप्रधान घरकुल योजनेच्या माध्यमातून घर बांधून मिळणेबाबत वेळोवेळी मागणी, मोर्चे, आंदोलने करुनदेखील अद्यापही त्यांना राहण्यासाठी दोन गुंठे जागा न मिळणे, त्या कामगारांच्या प्रश्नावर तत्कालीन महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ मे, १९९८ रोजी ना. रामराजे निंबाळकर समिती नेमलेली असणे, या समितीने कामगारांना जमिन व घर देण्यासाठी सकारात्मक शिफारशी केलेल्या असणे, या शिफारशी शासनाने स्वीकारण्याबाबत व या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत या कामगारांनी मागणी केलेली असणे, त्यामुळे महाराष्ट्र शेती महामंडळाच्या १४ मळ्यांमधील हजारो कामगारांना घर बांधण्यासाठी शेती महामंडळाकडे शिल्लक असलेल्या जमिनीपैकी २ गुंठे जमिनी देण्याची व ना. रामराजे निंबाळकर समितीच्या शिफारशी स्वीकारुन या कामगारांना न्याय देण्याची नितांत आवश्यकता, तसेच महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत जलजीवन मिशन मधून पाणी पुरवठा योजना कळंब ग्रामपंचायतीस मंजुर होणे, या

ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी शेती महामंडळाकडील रत्नपुरीमळा, ता. इंदापूर येथील गट नं. १७८/१ (गावकळंब) येथील १० एकर क्षेत्र या पाणीपुरवठा योजनेच्या साठवण तलाव व पाण्याची टाकी बांधकामासाठी जागेची मागणी केलेली असणे, तसेच कळंब वालचंदनगर, रणगांव या गावातील मुस्लीम बांधवांनी या रत्नपुरी मळामधील गट नं. ३४८/१ मधील ३ हेक्टर जागा दफन भुमीसाठी मिळणेची मागणी शेती महामंडळाकडे केलेली असणे, वारंवार शेती महामंडळाकडे ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी प्रस्ताव सादर करुनही जागा विकास कामांसाठी उपलब्ध न होणे, तसेच खंडकरी शेतकरी यांना वाटप झालेले क्षेत्र १० वर्ष झाल्यानंतर भोगवटा वर्ग २ चे भोगवटा वर्ग १ मध्ये शासनाकडून रुपांतर होणे अपेक्षित असतांनाही भोगवटा वर्ग-१ मध्ये न होणे, याबाबत शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्री.समीर कुणावार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्रात ग्रामीण व शहरी भागात अनेक गोरगरीब कुटुंब गेल्या २० ते ३० वर्षापासून अतिक्रमण करून राहात असणे, देशाचे पंतप्रधान यांनी देशात पंतप्रधान आवास योजना सुरू करणे, त्या अंतर्गत "सर्वांसाठी घरे" हा उपक्रम देशात सुरू असणे, महाराष्ट्रात अनेक गावात ग्रामपंचायत हद्दीमध्ये तसेच शहरी भागातील वॉर्डमध्ये सदर गरीब कुटुंब २०-३० वर्ष रहात असणे, परंतु सदर जागा वन विभाग तसेच महाराष्ट्र शासन यांच्या मालकीची असणे, त्यामुळे त्यांना जमीनीचे स्थायी पट्टे न मिळणे, शासनाने सन २०११ पुर्वीचे अतिक्रमण नियमानुकूल करून त्यांना स्थायी पट्टे देण्याकरीता आदेश काढणे, परंतु ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीमध्ये असूनसुध्दा त्यांना अद्यापही स्थायी पट्टे न मिळणे, महाराष्ट्रातील लाखो कुटुंब स्थायी पट्ट्याची वाट पाहत असणे, सदर कुटुंबाचे नावे ग्रामपंचायत मधील "ब" यादी व "ड" यादी यामध्ये त्यांचा समावेश असणे, यादीनुसार घरकूल मंजुर होणे, परंतु स्थायी पट्टा नसल्याने त्या घरकुलाचा लाभ कुटुंबाला न मिळणे तसेच शासनाने गेल्या अनेक वर्षामध्ये ग्रामीण भागातील हद्दवाढीसाठी पुर्वीप्रमाणे रहिवाशी क्षेत्राकरीता जागा अधिग्रहण बंद करणे, तसेच अजूनही अनेक गावात रहात असलेल्या नागरिकांची नावे 'ड' या प्रतिक्षा यादीमध्ये नसणे, प्रतिक्षा यादी 'ड' ची नव्याने सर्वेक्षण करण्याची आवश्यकता, त्यामुळे ग्रामीण भागातील लाखो कुटुंब घरकुलापासुन वंचित रहाणे, या सर्वांना स्थायी पट्टे देण्याची आवश्यकता, अतिशय कठीण परिस्थितीत सदर कुटुंब जगत असणे, वारंवार यासंदर्भात जनतेकडून होत असलेली मागणी, त्यामुळे जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक** : **प्रश्नोत्तरे**

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

**(क)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१३-२०१४ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(छ)** फ्लेम विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ञ)** डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ट)** सोमय्या विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ठ)** एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** डी.वाय.पाटील इंटरनॅशनल विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१८-२०१९ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ढ)** सिम्बॉयोसिस स्किल ॲण्ड प्रोफेशनल विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ण)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(त)** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सतरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(थ)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पासष्ठावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(द)** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(**ध**) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(**न**) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(**प**) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकोणसाठावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(**फ**) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **मृद व जलसंधारण मंत्री** : महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बावीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **बंदरे मंत्री** : महाराष्ट्र सागरी मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : औचित्याचे मुद्दे (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहर व उपनगरात राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरू असलेल्या अनेक प्रकल्पातील बाधित रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न ऐरणीवर येणे, प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन आहे त्याच परिसरात किंवा आसपासच्या ५ किलोमीटरपर्यंत करण्याची स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधींकडून होत असलेली मागणी, मुंबईतील प्रकल्प बाधितांना मुंबई महानगरपालिकेमार्फत केवळ दिड पट

नुकसान भरपाई मिळत असणे, केंद्र सरकारच्या धर्तीवर ४ पट नुकसान भरपाई मिळण्याची मागणी होत असणे, प्रकल्प बांधितांसाठी तयार करण्यात आलेल्या सदनिकांचा काळा बाजार होत असणे, मुंबई उच्च न्यायालयाने प्रकल्प बांधितांना माहूल येथे स्थलांतरीत करू नये असे स्पष्ट आदेश दिलेले असताना देखील रहिवाशांना माहूल येथे स्थलांतरीत करणे, या सर्व घटनांमुळे नागरिकांच्या मनात शासनाविरुध्द रोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, सुनिल कांबळे, श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शिवाजीनगर येथील औंध, बोपोडी भागातील अंडी, चिकन, मटन अशा सर्व प्रकारच्या विक्रेत्यांचे विविध मार्केट व हॉटेल्स असणे, हा परिसर अतिशय गजबजलेला असणे, सुमारे शेकडो दुकाने व आजूबाजूच्या परिसरातील ही दुकाने व हॉटेल्स सकाळपासूनच सुरू असणे, रात्री आपला व्यवसाय बंद करताना उर्वरित राहिलेले चिकन, मटन, अंडी, मासे निरुपयोगी कचरा ते मुळा नदीपात्रामध्ये टाकत असणे, यामुळे याठिकाणाहून जाणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होणे, त्यांचे आरोग्य धोक्यात येणे, तसेच नदी प्रदूषण होणे, अशा बऱ्याच समस्या निर्माण होणे, पुणे महानगरपालिकेमार्फत या जागेची दररोज स्वच्छता केली जात असणे, परंतु या निरुपयोगी कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता पुणे महानगरपालिकेकडे कुठल्याही प्रकारची उपायोजना नसणे, त्यामुळे नागरिकांचे आरोग्य गंभीररित्या धोक्यात येण्याची दाट शक्यता असणे, चिकन, मटन, अंडी, मासे यातील निरुपयोगी कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) ॲड.अशोक पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे महानगरपालिकेत वाघोली गावाचा समावेश दीड वर्ष होऊनही तेथील जवळजवळ साडे तीन लाख नागरिक अद्यापही मुलभूत सुविधांपासून वंचित असणे, वाघोली गावातील नागरिकांना रस्ते, ड्रेनेज लाईन, पाणी इ. मुलभूत सुविधा उपलब्ध नसणे, अद्यापही तेथील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्यामुळे अनेक वर्षापासून त्यांना टँकरमार्फत स्वखर्चाने व जादा दराने पाणी विकत घ्यावे लागणे, सदर भागाकरिता पीएमआरडीएकडून सुरु असलेल्या नळपाणी पुरवठा योजनेचे काम प्रलंबित असणे, या गावातील मुलभूत समस्यांबाबत मा. आयुक्त पीएमआरडीए यांच्या कार्यालयात दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी बैठक झालेली असून अद्यापही या सुविधा प्राप्त झालेल्या नसणे, पुणे महानगरपालिकेने भामा आसखेड या धरणाचे पाणी आणलेले असतानाही त्याचा कोणताही लाभ वाघोली गावातील नागरिकांना

मिळालेला नसणे, त्यामुळे या भागात पाणीटंचाईची बिकट परिस्थिती निर्माण होणे, भामा आसखेड धरणाच्या पाण्यातील एक फाटा वाघोली गावाकरिता वळविल्यास या गावातील पाणी प्रश्न सुटू शकतो, याबाबत नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधींची वारंवार मागणी करुनही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यास्तव वाघोली गावातील नागरिकांचा पाणी प्रश्न व मुलभूत सुविधांचा प्रश्न मार्गी लावण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) सर्वश्री अमीन पटेल, अस्लम शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छ मुंबई – सुंदर मुंबई या उपक्रमात सफाई कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा असणे, सफाई कर्मचारी वारसा हक्क पद्धतीने पिढ्यान पिढ्या सफाई कामगार म्हणून कार्यरत असणे, विशेषतः कोविड काळात त्यांनी दिलेल्या सेवेला विशेष महत्व असणे, सेवेत कार्यरत असेपर्यंत त्यांना महापालिकेच्या वसाहतीमध्ये घरे राहण्यासाठी उपलब्ध होणे, सेवानिवृत्त झाल्यानंतर सदर घर खाली करण्यासाठी त्यांच्यावर कारवाई करण्यात येणे, सेवानिवृत्तीनंतर त्यांची मुंबईमध्ये राहण्याची पर्यायी व्यवस्था नसणे, त्यामुळे सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे मिळावीत अशी मागणी सफाई कर्मचाऱ्यांकडून वारंवार होत असणे, या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी अधिवेशन काळात वारंवार प्रश्न उपस्थित करणे, सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची घरे मिळावीत यासाठी शासन स्तरावर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन सन २०२२ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांनी सभागृहात देणे, त्यानंतर सन २०२३ च्या अर्थसंकल्प अधिवेशनाच्या काळात लक्षवेधीच्या माध्यमांतून पुन्हा हा विषय सभागृहात मांडण्यावर विद्यमान मंत्री महोदय यांनी दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी सविस्तर माहितीसह लाड पागे समितीचा जो अहवाल आहे तो स्वीकारून त्याची तातडीने अंमलबजावणी केली जाईल अशा सूचना दिल्या जातील असे आश्वासन सभागृहात देणे, सफाई कर्मचाऱ्यांच्या वसाहती आश्रय योजना व श्रम साफल्य योजनेअंर्तगत पुनर्विकसित करण्याचे धोरण ठरविण्यात येणे, त्याअनुषंगाने सफाई कामगारांना देण्यात येणाऱ्या भाडे रक्कमेमध्ये वाढ करीत रु.२५,०००/- इतके भाडे देण्यासंदर्भातील सुचना मुंबई महानगरपालिका आयुक्तांना दिले जातील व त्याची अंमलबजावणी तात्काळ केली जाईल असे आश्वासन सभागृहात देणे, परंतु अद्यापही त्यावर कोणतीही कारवाई झालेली नसणे, आश्रय योजना व श्रमसाफल्य योजनेत असणाऱ्या विरोधाभासामुळे सफाई कर्मचारी संभ्रमात असणे, त्यामुळे सफाई कामगार वर्गात पसरलेले असंतोषाचे वातावरण, लाड पागे समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५)**

**(५) ॲड.राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील ५१ महसुली गावांचा समावेश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत झाल्याने औद्योगिकीकरण व नागरिकीकरण झपाट्याने वाढत असणे, वाढत्या औद्योगिकीकरण व नागरिकीकरणामुळे, मोठ्या प्रमाणावर परप्रांतीय कामगारांचे वास्त्यव्य देखील या ठिकाणी असणे, औद्योगिक क्षेत्रात केमिकलचे कारखाने असल्याने वारंवार अपघात देखील होत असणे, यवत पोलीस स्टेशनअंतर्गत पाटस दूरक्षेत्र कार्यरत असणे, यवत व दौंड या दोन्ही पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्र मोठे असल्यामुळे व इतर तालुक्याच्या तुलनेत दौंड तालुक्यात फक्त दोनच पोलीस स्टेशन असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठा ताण पडत असणे, यवत (ता. दौंड) येथील पोलीस ठाण्याचे विभाजन करून पाटस या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली असणे, याबाबत नवीन पोलीस स्टेशन प्रस्तावित असणे, पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या सुधारित आकृतीबंधामध्ये पाटस या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन निर्माण करणेबाबतच्या प्रस्तावाचा समावेश करण्यात आलेला असणे, हा सुधारित आकृतीबंध वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून, वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल असे शासनाकडून माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये कळविण्यात येऊन देखील अद्यापही कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, यादरम्यान सन २०२० पासून पुणे जिल्ह्यात ५ ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन्स व एका ठिकाणी पोलीस उपमुख्यालय मंजूर करण्यात आलेले असणे, दौंड पोलीस स्टेशन हद्दीतील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी गोपाळवाडी परिसरात पोलीस चौकी सुरू करण्याची मागणी देखील अनेक दिवसांपासून प्रलंबित असणे, तसेच दौंड व यवत या दोन्ही पोलीस स्टेशनच्या इमारती खूप जुन्या झालेल्या असून मोडकळीस आलेल्या असणे, दौंड उपविभागीय अधिकारी (DYSP) कार्यालयासाठी असलेली जागा व इमारत अपूरी पडत असणे, पोलीस कर्मचारी व अधिकारी यांची निवासस्थाने पडलेली असून, अनेक दिवसांपासून वापरात नसल्याने त्याठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले असणे, या सर्व इमारतींची पुनर्बांधणी करणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यक निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनदरबारी दिनांक ७ जुलै, २०२३ रोजी सादर करण्यात आलेला असणे, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ व ७ ची समादेशक कार्यालय, गट भांडार, दवाखाना व बराक अशी अनेक प्रशासकीय इमारतींची बांधकामे प्रलंबित असणे, सदर बांधकाम प्रस्तावास मान्यता मिळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री.सुहास कांदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"खंडणी मागितल्या प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नाशिक शहर पोलीस ठाणे यांचेवर गुन्हा दाखल झाल्याची धक्कादायक बाब माहे मे, २०२३ मध्ये उघडकीस येणे, स्थानिक लोकप्रतिनिधींना तक्रार करण्यापासून वंचित ठेवण्याकरिता खोट्या गुन्ह्यात अडकवून व गोवण्याची धमकी सदरहू अधिकाऱ्यांकडून दिली जात असणे, लोकप्रतिनिधीनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याअंती सर्व बाबींची सत्यता पडताळणी करुन त्यांची निर्दोष मुक्तता करुन या उलट वरिष्ठ पोलीस निरिक्षक नाशिक यांच्याविरुध्द सीआरपीसी कलम १५६ (३) अंतर्गत गंगापूर पोलीस ठाणे नाशिक येथे तपास करण्याचे न्यायालयाने दिलेले आदेश, सदरहू तपास करताना प्रशासनाकडून होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ, यापूर्वी ही एका महिलेने फसवणूकी प्रकरणी २०१६ मध्ये गंगापूर पोलीस ठाण्यात सदरहू अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये न्यायालयाने कलम ३८४ अंतर्गत गुन्हा दाखल केल्याचे दिलेले आदेश, सदरहू प्रकरणी त्रयस्त व्यक्तींमार्फत पैशाची मागणी करण्यात येणे, अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांना प्रशासनाकडून मिळत असलेले संरक्षण, अवैध मार्गाने जनतेची आर्थिक फसवणूक करुन बेहिशेबी मालमत्ता जमविलेल्या अधिकाऱ्यांची उच्च स्तरीय पारदर्शक चौकशी होण्याची नितांत आवश्यकता, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री.महेश बालदी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पनवेल-उरण (जिल्हा रायगड) तालुक्यात मुंबई व इतर ठिकाणाहून मुरूम, चिखलमाती व डेब्रिजच्या गाड्या पर जिल्यातील ठेकेदार वाहतूक करीत असणे, स्थानिक प्रशासनाची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता वाहतूक करीत असलेला माल पनवेल - उरण तालुक्यात खाली केला जात असणे, उक्त विभागातील तहसीलदार, संबंधित महसूल अधिकारी व जिल्हा खणीकर्म विभाग हा चिखल, मुरूम व डेब्रिज या मालाचा खोटा पंचनामा करून दगड आहे असे दाखवून ठेकेदारांना झिरो रॉयल्टी पासेस पुरवीत असणे, झिरो रॉयल्टी पासेसमध्ये शासनाला कोणत्याही प्रकारचा महसूल न मिळता कायदेशीर पद्धतीने गौण खनिजाची वाहतूक करता येते, परंतु यामुळे शासनाचे प्रति ब्रास ६०० रुपये याप्रमाणे करोडो रुपयाचा महसुल बुडत असून वस्तू सेवा कर (GST) देखील बुडत असल्याने शासनाचे होत असलेले नुकसान, स्थानिक दगड खाण मालक व ठेकेदार रीतसर रॉयल्टी भरून प्रामाणिकपणे व्यवसाय करीत असणे, पर जिल्ह्यातील ठेकेदारांच्या या मनमानी कारभारामुळे स्थानिक क्रशर मालक व ठेकेदार यांचे नुकसान होत असल्यामुळे त्यांच्या

व्यवसायावर विपरीत परिणाम होत असणे, त्यामुळे स्थानिक क्रशर मालक व ठेकेदारांमध्ये पसरलेला असंतोष, झिरो रॉयल्टी पासेसचा वापर करून गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या पर जिल्ह्यांतील ठेकेदारांवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) डॉ.विनय कोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पन्हाळा शाहूवाडी तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांच्या जंगला नजीक असणाऱ्या शेतातील पिकांची गवारेड्यांकडून मोठ्या प्रमाणात नुकसान व शेतकऱ्यांवर हल्ला करून जायबंदी करत असणे, काही वेळा शेतकरी दगावत असणे, याचा फटका शेतकरी कुटुंबांना बसत असून शेतीवर अवलंबित शेतकरी त्यामुळे हवालदिल झालेले असणे, वन विभागाकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानीचा सारासार विचार न करता प्रति गुंठा रुपये १४०/- प्रमाणे ६ ते १० गुंठ्यांपर्यंत तुटपुंजी नुकसान भरपाई दिली जाणे, त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या सर्व कुटुंबाला आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत असणे, पन्हाळा शाहूवाडी व परिसरातील जंगला नजीक असणाऱ्या शेतातील पिकांची गवारेड्यांकडून मोठ्या प्रमाणात नुकसान केल्यास अथवा हल्ला करून जखमी केल्यास अशा शेतकऱ्याला झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात नुकसान भरपाई म्हणून प्रति गुंठा रुपये २००/- प्रमाणे ४० गुंठ्यांपर्यंत नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बुलडाणा जिल्ह्यात खरीप हंगाम सन २०२२-२३ मध्ये ३,५७,००० शेतकऱ्यांनी पीकविमा काढलेला असणे, त्यातील २,५१,००० शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरलेले असणे, याचाच अर्थ पीक विमा काढलेल्या शेतकऱ्यांपैकी अजूनही १,०६,००० शेतकरी नुकसान होऊनही त्यांना नुकसान भरपाई मिळालेली नसणे, बुलडाणा जिल्ह्यात सततचा पाऊस व अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झालेले असून यामध्ये झालेल्या नुकसानीची माहिती ७२ तासाच्या आत देणे बंधनकारक करण्यात येणे, परंतु अनेक शेतकऱ्यांना ७२ तासाच्या आत तक्रार करावी लागते याचीच माहिती नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी तक्रारी केलेल्या नसणे, याबाबत ऑनलाईन तक्रारीबाबतचे अज्ञान, त्यातल्या त्यात अनेक शेतकरी वयोवृध्द असणे, काही शेतकऱ्यांनी खाजगी केंद्रावर तक्रारी दाखल केल्या परंतु खाजगी केंद्र वाल्यांनी पैसे घेऊनही तक्रारी दाखल न करणे, अनेक ठिकाणी लिंक नसणे, शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या परंतु ऑनलाईन दाखल न होणे, अशी अनेक कारणे असल्याने नुकसान होऊनही त्यांना नुकसान भरपाई मिळालेली नसणे, वस्तुतः बुलडाणा जिल्ह्यासह

राज्यभरात सततचा पाऊस व अतिवृष्टीमुळे सर्व दूर नुकसान झालेले असणे, त्यामुळे सर्वांना झालेल्या नुकसानीप्रमाणे नुकसान भरपाई मिळणे अपेक्षित असणे, तसेच ७२ तासानंतर तक्रारी केल्याचे कारण दाखवून पीकविमा कंपनीने बुलडाणा जिल्ह्यातील पीके उभे असतानाच्या ९८७४ तर पीक काढणीच्या नंतरच्या १७५५ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पासुन अपात्र ठरविण्यात आलेले असणे, त्यामुळे तक्रारी करूनही केवळ उशिराने तक्रार दिल्याचे कारण दाखवून बुलढाणा जिल्ह्यातील जवळपास ११,६२९ नुकसान भरपाईस अपात्र केलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालेली नसणे, ज्या शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या नाही तसेच तक्रारी करूनही उशीरा तक्रार केली म्हणून अपात्र ठरविण्यात आलेल्या सर्व शेतकऱ्यांना पात्र ठरवून नुकसान भरपाई देण्याबाबत पीक विमा कंपनीकडून होणारी टाळाटाळ, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री.बबनराव लोणीकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या पत्रानुसार ६० हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या जालना जिल्ह्यातील परतूर शहरासाठी ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय आवश्यक असून मागील आठ ते दहा वर्षापासून सदरील मागणी करण्यात येणे, मंत्रालय स्तरावर परतुर येथील उपजिल्हा रुग्णालयाचा प्रस्ताव प्रलंबित असणे, तात्काळ या प्रस्तावास मंजुरी देण्याची गरज, परतुर शहर व ग्रामीण भागातील लोकसंख्येची घनता पाहता उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(११) श्री.उदयसिंग राजपुत, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिम उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ वरील करोडी पासून ते चाळीसगाव अट्रोम घाटापर्यंतचा रस्ता बांधण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग संस्था (एनएचआय) संभाजीनगर यांच्यामार्फत श्री दिलीप बिडकोन प्रा.लि. या कंपनीला अटी व शर्तीनुसार देण्यात येणे, या निविदेतील अटी शर्तीनुसार रस्त्यांच्या दोन्ही बाजूला झाडे लावून जगवणे बंधनकारक असतांना जुन्या रस्त्यावर लाखो झाडांची कत्तल करुन त्या मोबदल्यात नविन झाडे लावण्यात न येणे, त्यांनी पाहिजे तशा प्रकारच्या मातीचा थर भराव न करता काळया मातीवरच डांबरीकरण केल्यामुळे अनेक ठिकाणी रस्ते खचले असल्याचे निदर्शनास येणे, या रस्त्याला अनेक ठिकाणी रस्ता पावसाळयात उन्हाळयात खचतो, रस्त्यावर अनेक प्रकारचे अँड डयुलेशन निर्माण झाल्याने अपघाताचे प्रमाणसुध्दा वाढणे, तसेच रस्त्यालगतची स्ट्रीट लाईटदेखील अनेक ठिकाणी बंद अवस्थेत असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या सुमारास तसेच वारंवार प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग संस्था

(एनएचआय), संभाजीनगर यांच्याकडे तांत्रिक दर्जाची सल्लागार समिती नेमून चौकशी करण्याची लेखी मागणी करण्यात येणे, परंतु अद्यापही या प्रकरणाची चौकशी न झाल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधितांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चेची सूचना)**

**डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अनिल देशमुख, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, सुनिल केदार, अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. विकास ठाकरे, अमीन पटेल, अमित देशमुख, धिरज देशमुख, नाना पटोले, डॉ.विश्वजित कदम, डॉ.नितिन राऊत, सर्वश्री. मोहन मते, जयंत पाटील, चेतन तुपे, रविंद्र वायकर, अतुल भातखळकर, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, अजय चौधरी, दिलीप मोहिते-पाटील, अबू आजमी, जयकुमार रावल, श्रीमती श्वेता महाले, श्री. शिरीष चौधरी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यातील महिला व मुलींवरील अत्याचारात वाढ झालेली असून देशपातळीवर महाराष्ट्राचा महिला अत्याचारात तिसरा क्रमांक असल्याची चिंताजनक माहिती माहे जुलै, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, कामावर महिलांचा छळ होण्याच्या घटनांमध्ये १३९ टक्क्यांनी वाढ झालेली असणे, बलात्कार आणि अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये २१७ टक्क्यांनी वाढ झालेली असणे, बाललैंगिक गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक असणे, गत वर्षात सुमारे चार हजार महिला व मुली गायब असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आलेली असणे, गायब असलेल्या महिला, मुलींना शोधण्यात आलेले नसणे, महिला, मुली व बालकांवरील अत्याचारासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यास प्रशासनास आलेले अपयश, सदर प्रकरणी तातडीने कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ४ जुलै, २०२३ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असणे, या बेपत्ता झालेल्यांमध्ये सर्वाधिक ९८ मुली व महिलांचा समावेश दिसून येणे, त्यामुळे महिला व मुली असुरक्षित आहेत हे स्पष्ट दिसून येणे, धुळे जिल्ह्यातील एकूण १७ पोलीस ठाण्यांतर्गत दिनांक १ जानेवारी ते ५ एप्रिल, २०२३ दरम्यान एकूण २८३ जणांचा विविध कारणांमुळे आकस्मिक मृत्यू झालेला असणे, त्यापैकी २६६ जणांचे वारसदार आढळून येणे तर १७ जण बेवारस असल्याची नोंद पोलीस दप्तरी झालेली असणे, याच कालावधीत २४४ जण हरवल्याच्या तक्रारी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आलेल्या असणे, त्यापैकी २० जणांना शोधून काढण्यात पोलिसांना यश येणे, त्यात २ पुरुष १ महिला, ४ मुले आणि ८ मुलींचा समावेश असणे, एकूण ९८ महिला, ७७ मुली व ६८ पुरुष आणि ३३ मुले अद्यापही पोलीस दप्तरी बेपत्ता असल्याची नोंद झालेली असणे, तसेच माहे जानेवारी, २०२३ ते माहे मार्च, २०२३ या ३ महिन्यांच्या कालवधीत

राज्यातील ५,६१० तरुणी व महिला बेपत्ता असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, बेपत्ता झालेल्या महिलांमध्ये १६ ते २५ या वयोगटातील ३ हजार ५९४ तरुणींचा समावेश असणे, माहे मार्च, २०२३ मध्ये सर्वाधिक २,२०० मुली व महिला बेपत्ता झाल्यापासून बेपत्ता होण्याचे प्रमाण दिवसाला सरासरी ७० असे असणे, बेपत्ता झालेल्या मुली व महिला यांचे प्रमाण पुणे येथे अधिक असून पुण्यातून २,८५८ मुली व महिला बेपत्ता झालेल्या असणे, अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव येथे राहणाऱ्या व पुण्यात अभ्यास करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत चांगले यश मिळवून अधिकारी झालेल्या दर्शना पवार यांचा मृतदेह दिनांक १८ जून, २०२३ रोजी वेल्हे पोलिस स्टेशनच्या हद्दीत आढळून येणे, पोलिसांनी याबाबत चौकशी करुन आरोपी श्री.राहुल हंडोरे याला दिनांक २२ जून, २०२३ रोजी अटक करणे, श्रीमती पवार ह्या ८ दिवसांपासून बेपत्ता झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करणे, त्यानंतर त्यांचा मृतदेह पोलिसांना पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील राजगडाच्या पायथ्याजवळ कुजलेल्या अवस्थेत सापडणे, आरोपीने हत्या केल्याची कबुली पोलिसांकडे देणे, ही घटना ताजी असतानाच दिनांक २७ जून, २०२३ रोजी सकाळी १० वाजता पुण्यात एका तरुणीवर कोयत्याने हल्ला करुन एकतर्फी प्रेमातून तिची हत्या करण्याच्या उद्देशाने कोयता घेऊन एका तरुणाने तिच्या मागे धावून तिची हत्या करण्याचा प्रयत्न करणे व थोडक्यात तिची हत्या करण्यात अपयशी ठरल्याची घटना उघडकीस येणे, या हल्ल्यात तरुणी जखमी होणे, मात्र दोन तरुणांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून या तरुणीची जीवघेण्या हल्ल्यातून सुटका करणे, महिला-मुलींवरील अत्याचार आणि बाललैंगिक गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस होणारी वाढ, तसेच महिला बेपत्ता होण्याचे व एकतर्फी प्रेमातून महिलांवर हल्ले होण्याच्या वाढलेल्या घटनांमुळे राज्यातील जनतेत पसरलेले भितीचे वातावरण, राज्यातील महिलांना सुरक्षित ठेवण्यासाठी उक्त प्रकरणांचा काटेकोर तपास करून गुन्हेगारांना विनाविलंब कठोर शिक्षा होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२३

**(ब) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ - एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर विधेयक, २०२३.

**(२)** सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ९ - डीईएस पुणे विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२३.

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) (क) **सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी, अमीन पटेल, अमित झनक व प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र पुणे शहर महानगरपालिका कराधान (भूतलक्षी प्रभावाने कराधान नियमांचे अधिनियमन व सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र पुणे शहर महानगरपालिका कराधान (भूतलक्षी प्रभावाने कराधान नियमांचे अधिनियमन व सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी, अमीन पटेल, अमित झनक व प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र पुणे शहर महानगरपालिका कराधान (भूतलक्षी प्रभावाने कराधान नियमांचे अधिनियमन व सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र पुणे शहर महानगरपालिका कराधान (भूतलक्षी प्रभावाने कराधान नियमांचे अधिनियमन व सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**आठ : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

**सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, नाना पटोले, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रविंद्र वायकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी, विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश**

**फातर्पेकर, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय पोतनीस, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री.संग्राम थोपटे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री कैलास गौरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी, संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, श्री.रविंद्र धंगेकर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने विधानसभेत स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे. राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी महाराज नगर (औरंगाबाद) यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृध्दी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना नांदेड महामार्गचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड-लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्यांना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड औरंगाबाद परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर

जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण उर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पद भरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थीना शुल्क भरण्यात अडचणी येणे, केवायसीच्या नावाखाली अतिवृष्टी व पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेली खीळ, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

नऊ : **श्री. भरतशेट गोगावले, ॲड. आशिष शेलार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री प्रताप सरनाईक, राम कदम, सुनिल शेळके, संजय शिरसाट, अतुल भातखळकर, यशवंत माने, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री नितेश राणे, दत्तात्रय भरणे, ज्ञानराज चौगुले, योगेश सागर, दिपक चव्हाण, सदा सरवणकर, सुनील राणे, संग्राम जगताप, डॉ. बालाजी किणीकर, ॲड. पराग अळवणी, श्री. अतुल बेनके, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री अमित साटम, दिलीप मोहिते-पाटील, सुहास कांदे, डॉ. संजय कुटे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री मंगेश कुडाळकर, गणेश नाईक, जयकुमार रावल, किशोर पाटील, प्रशांत बंब, राजेश पाटील, रमेश बोरनारे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री नितीन पवार, संजय गायकवाड, संजय केळकर, बाबासाहेब पाटील, योगश कदम, ॲड. राहूल कुल,**

**श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री महेश शिंदे, राजेंद्र पाटणी, दिलीप बनकर, प्रकाश सुर्वे, सचिन कल्याण-शेट्टी, महेंद्र थोरवे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री संतोष बांगर, रणधीर सावरकर, दिलीप लांडे, किसन कथोरे, ॲड. आशिष जैस्वाल, सर्वश्री मिहीर कोटेचा, नरेंद्र भोंडेकर, जयकुमार गोरे, चंद्रकांत निंबा पाटील, नारायण कुचे, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रशांत ठाकूर, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री हरिभाऊ बागडे, अभिमन्यू पवार, राजेश पवार, हरिष पिंपळे, राणाजगजितसिंह पाटील, सुरेश भोळे, संभाजी निलंगेकर-पाटील, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड. आकाश फुंडकर, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री किर्तीकुमार भांगडिया, गणपत गायकवाड, सर्वश्रीमती नमिता मुंदडा, मंदा म्हात्रे, सर्वश्री बबनराव लोणीकर, तान्हाजी मुटकुळे, नामदेव ससाणे, श्रीमती मोनिका राजळे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, राम सातपुते, संजय सावकारे, कॅ. आर. तमिल सेल्वन, डॉ. देवराव होळी, सर्वश्री कृष्णा गजबे, मोहन मते, तुषार राठोड, महेश लांडगे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री सुनिल कांबळे, भिमराव केराम, पराग शाह, दिलीप बोरसे, महेश चौघुले, श्रीमती आश्विनी जगताप, श्री. संजिवरेड्डी बोदकुरवार, प्रा. डॉ. अशोक उइके, सर्वश्री सुभाष देशमुख, समिर कुणावार, मदन येरावार, टेकचंद सावरकर, राजेश पाडवी, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री काशीराम पावरा, बबनराव पाचपुते, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री मंगेश चव्हाण, धनंजय गाडगीळ, दादाराव केचे, कृष्णा खोपडे, विजय रहांगडाले, कालीदास कोळंबकर, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री संतोष दानवे, समाधान आवताडे, विजय देशमुख, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्याच्या दृष्टीने विद्यमान शासनाने सेफ्टीचे पर्सेप्शन तयार केले असणे, अनादी काळापासून प्रत्येक राज्य व्यवस्थेमध्ये गुन्हे घडत असले तरी देशातील अन्य राज्यांच्या दृष्टीने आपला महाराष्ट्र गुन्हेगारी रोखण्यात आघाडीवर असल्याचे निदर्शनास येणे, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मागील वर्षभरात अनेक गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली असणे, २३९ लोकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात येणे, अंमली पदार्थांच्या संदर्भात सन २०२२ मध्ये हजारो गुन्हे दाखल असून मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, खंडणीबाबत घडणारे गुन्हे मोठ्या प्रमाणात कमी झालेले असणे, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ॲन्टी नार्कोटीक सेल तयार करण्यात आला असणे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात नार्कोटीक्सच्या संदर्भात शासनाने झिरो टॉलरन्स पॉलीसी सुरु केली असणे, विद्यमान शासनाने २० हजार पोलीस भरतीची एकत्रित प्रक्रिया राबवून सर्व रिक्त पदे भरण्यासाठी पद भरतीचे निर्बंध शिथील केले असणे, पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांना वर्षाकाठी देय असलेल्या नैमितिक रजा १२ ऐवजी २० करण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीसांना सवलतीच्या दरात गृह कर्जासाठी सन २०१७ ची लोकप्रिय योजना की जी मागील शासनाने बंद केली होती ती पुन्हा लागू केली असणे, राज्यात ३४ फॉरेन्सिक लॅब तयार करण्यात आल्या असून टेक्निकल एव्हिडन्स हा ह्युमन एव्हिडन्सपेक्षा बोलका असल्याने व ह्युमन एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत असल्याने परंतु टेक्निकल

एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत नसल्याने ही वस्तुस्थिती विचारात घेता फॉरेन्सिक लॅब अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य पोलीस व मुंबई पोलीस यांनी ऑपरेशन मुस्कानच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ३८ हजार बालकांना त्यांच्या घरी सुखरूप पोहचविल्याचे निदर्शनास येणे, देशात हरवलेली बालके व पळून आलेली बालके शोधून त्यांच्या घरापर्यंत पोचविण्याच्या कामात मुंबई व महाराष्ट्र पोलीसांचा प्रथम क्रमांक असल्याचे निदर्शनास येणे, राजकीय व सामाजिक आंदोलनातील गुन्ह्यांमध्ये जून २०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीस दलातील शिपाई, पोलीस शिपाई, चालक, सशस्त्र पोलीस संवर्गातील विविध कारणास्तव रिक्त झालेली पदे तात्काळ भरण्यास शासनाने मान्यता दिली असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सवाच्या कालावधीत ज्या गुन्ह्यांमध्ये ३१ मार्च, २०२० पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले आहेत व ज्या खटल्यांमध्ये अटी-शर्तींची पुर्तता होते असे खटले मागे घेण्याची कार्यवाही सुरू असणे, कोरोना प्रतिबंधक आदेश लागू झाल्यानंतर या आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे २१ मार्च, २०२० ते ३१ मार्च, २०२२ पर्यंत दाखल खटले मागे घेण्याची कायदेशीर कार्यवाही सुरू असणे, पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुर्नविकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, महिलांच्या समस्यांच्या संदर्भात वेगवेगळया जिल्ह्यात विशेष न्यायालये व जलद गती न्यायालये तयार करण्यात येणे, तसेच समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात येणे, बलात्काराच्या गुन्ह्यांबाबतीत ६० दिवसात चार्जशीट दाखल होण्याचे प्रमाण १८ टक्क्याहून वाढविण्यात पोलीस प्रशासनाला यश आल्याचे निदर्शनास येणे, राज्यात संवेदनशील असलेल्या नक्षलग्रस्त भागाकरिता शासनाने पुरेसा निधी उपलब्ध केलेला असणे, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने शासन प्राथमिकता देत असल्याने त्यानुषंगाने कन्व्हीक्शनचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न असणे, राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने आवश्यक माहिती व मदत मिळण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक १८१ महिला हेल्पलाईन सुरू केली असणे, राज्यात स्टीट क्राईम डिटेक्शनमध्ये गुणात्मक बदल करण्याच्या दृष्टीने कमांड ॲण्ड कंट्रोल सिस्टीम प्रकर्षाने राबविण्याचा व आणखी ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सव मोकळ्या वातावरणात पार पडावे या दृष्टीने शासनाने त्यावरील निर्बंध उठविले असणे, पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी केली असणे, गणेशमुर्तीच्या उंचीवरील निर्बंध उठविले असणे, गणेशोत्सवाला कोणतेही शासकीय शुल्क भरावे लागू नये याची दक्षता घेतली असणे, ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणे, एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ दांम्पत्यांना संरक्षण इत्यादी बाबतीत शासनाने कडक धोरण राबविल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यांत कपात झाली असणे, शासनाने मागील वर्षभरात न्यायव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने प्रत्येक स्तरावर न्यायालयांची स्थापना करणे व न्यायालयांसाठी नवीन पदे निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले असणे, राज्यातील कारागृह क्षमतेपेक्षा कैद्यांची संख्या अधिक झाल्याने राज्यात वेगवेगळया जिल्ह्यात नवीन कारागृहे बांधण्याची कार्यवाही सुरु असणे, कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत कठोर उपाययोजना करण्याबाबत शासनाने घेतलेल्या विविध

निर्णयांमुळे राज्यातील महिला, बालके, उपेक्षित वंचित घटक व ज्येष्ठ नागरिक चिंतामुक्त व मोकळ्या वातावरणात राहत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रखर करण्याच्या दृष्टीने सर्वंकष विचारविनिमयातून नव-नवे उपक्रम राबविण्याची व त्यायोगे राज्य पोलीस दल अधिक सक्षम करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २५ जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा